भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक २१.०९.२०१९ ते २५.०९.२०१९)

| अंक ७६/२०१९ | दिनांक २०.०९.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१४/०९/२०१९ ते २०/०८/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २१/०९/२०१९ ते २५/०९/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४/०९ | १५/०९ | १६/०९ | १७/०९ | १८/०९ | १९/०९ | २०/०९ | दिनांक | | २१/०८ | २२/०९ | २३/०९ | २४/०९ | २५/०९ |
| ५.२ | १२.८ | ३४.६ | ३९.० | ४.४ | ३३.९ | १२. ३ | पाऊस (मि. मी) | | १० | ११ | ८ | ४ | ४ |
| ३०.० | ३१.० | ३१.० | २८.० | ३१.० | २९.० | ३०.० | कमाल तापमान (अं. से) | | २९ | २९ | २८ | ३० | ३० |
| २४.० | २४.० | २३.० | २३.५ | २४.० | २४.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | | २४ | २५ | २४ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ६ | ७ | ५ | ३ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९५ | ९६ | ९३ | ९५ | ९५ | ९६ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९४ | ९४ | ९४ | ९३ | ९२ |
| ७८ | ६६ | ९० | ६७ | ८३ | ९२ | ७१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७६ | ७७ | ७९ | ७० | ६९ |
| १.३ | ०.९ | ०.८ | ०.१ | ०.६ | ०.१ | ०. २ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००९ | ००९ | ००६ | ००५ | ००४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | आग्नेये कडून | आग्नेये कडून | पूर्वे कडून |
| पश्चिमे | पश्चिमे | स्थिर | दक्षिणे | स्थिर | स्थिर | दक्षिणे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४१६३.३ | ४१६३.३ | १४२.२ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | दाणे भरण्याची अवस्था | भातामध्ये लोंब्या येण्यापुर्वी १० दिवस व लोंब्या आल्यानंतर १० दिवसांपर्यंत शेतातील पाण्याची पातळी १० सेमी ठेवावी. पिकातील दाणे भरेपर्यंत पाण्याची पातळी ५ सेमी ठेवावी.<br>जिल्ह्यात सततच्या पावसामुळे भातावर पाने गुंडाळणारी अळी या किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस १८ मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १३ मि.ली. प्रती १० लि. पाण्यामध्ये मिसळून पाऊसाची उघडीप पाहून फवारावे.<br>काही ठिकाणी भातावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव आढळुन आला असुन निळे भुंगेरे या किडीच्या नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस ४० मिली किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १२.५ मिली लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळुन पावसाची उघडीप पाहुन फवारावे. |
| भुईमुग | आरा अवस्था | भुईमुग पिक काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत असुन हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे उत्पन्न वाढते. |
| आंबा | - | आंब्यावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ०.३% (३० ग्रम/१० ली. पाणी) किंवा ०.१% बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहुन फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठ्या फांद्यामधुन डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासुन त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी.<br>आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांद्या, बांडगुळे कापुन घ्यावीत व त्या ठिकाणी १% बोर्डो मिश्रण लावावे.<br>पॅक्लोब्युट्रॉझॉल (कल्टार) दिलेल्या झाडांचे बुंधे व त्याभोवतालचा भाग बेणणी करुन अथवा ग्रामोक्झोन हे तणनाशक फवारुन तणविरहीत ठेवावेत. |
| काजु | - | सततच्या व अति पावसामुळे काजु पिकावर अचानक पानगळ/पानकुज आणि फांद्या वाळण्याची समस्या निर्माण झाली आहे.<br>रोगग्रस्त बागेतील रोगामुळे गळुन पडलेली पाने बागेपासुन दूर अंतरावर खोल खड्ड्यात गाडुन टाकावीत. त्याचबरोबर रोगाने बाधित झालेल्या फांद्या कापुन काढाव्यात व त्यावर त्वरीत बोर्डोपेस्टचा लेउ द्यावा.<br>पानगळ/पानकुज रोग नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील ८%+मॅन्कोझेब ६४% हे बुरशीनाशक १० लिटर पाण्यात २० ग्रॅम या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. |
| नारळ व सुपारी | फळधारणा | नारळ व सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी १% बोर्डोमिश्रनाची फवारणी करावी. |
| केळी | निसवणि | केळीवर मावा किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास डायमिथोएट १५ मिली प्रती १० लि. पाण्यातून १५ दिवसांच्या अंतराने ३ वेळा फवारावे. |
| भाजीपाला | फळधारणा | नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करावे.वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळ्या व कुक्कुटपालन | - | पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली गाई व म्हशींना पायलाग रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली शेळ्यांना पी.पी. आर (माथा) रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. कोंबड्यांचे उन्हापासून संरक्षण करावे. |
| मस्त्यपालन | | शोभिवंत मस्त्यपालन करणा-या शेतक-यांनी बीर निर्मिती व विरळणी कार्यक्रम चालु ठेवावा. बोटुकली आकाराचे मस्त्यबीर प्राप्त झाल्यानंतर त्यांची साठवणुक १००० नग प्रति हेक्टरी याप्रमाणात संवर्धन तळ्यात करावी व बीजाच्या वजनाच्या ८ ते १० टक्के एवढे कृत्रीम खाद्य रोज दोनवेळा विभागुन द्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ओफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)